# भाषांतरातून भाषा व ज्ञानसाधना

## एक विशेष शिक्षक प्रशिक्षण उपक्रम

**आपण शालेय शिक्षक आहात? आपल्याला आपल्या विद्यार्थ्यांचे मराठी व इंग्रजी भाषाप्रभुत्त्व समृद्ध करण्यासाठी व त्यांना भविष्यासाठी ज्ञानकर्मी म्हणून घडविण्यासाठी आपल्या शाळेत वा स्वतंत्रपणे एक विशेष उपक्रम सक्रियरित्या राबवायला आवडेल काय?**
**यासाठी आपणाला "ज्ञानयोगी शिक्षक" होण्याचे विशेष प्रशिक्षण घ्यायला आवडेल काय?**

आमच्या "नॉलेजफाऊन्टन" या संस्थेतर्फे **"भाषांतरातून भाषा व ज्ञानसाधना"** या वैशिष्टयपुर्ण उपक्रमात आम्ही आपले स्वागत करतो.

या उपक्रमात सहभागी होणाऱ्या शिक्षकांना शालेय विद्यार्थ्यांना इंग्रजी मराठी तसेच मराठी इंग्रजी भाषांतराच्या माध्यमातून मराठी व इंग्रजी भाषेची पद्धतशीरपणे साधना करण्याचे विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

हा उपक्रम ज्येष्ठ ज्ञानव्यवस्थापनतज्ज्ञ, भाषाशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, अनुभवी प्रसिद्ध भाषांतरकार व शैक्षणिक अभ्यासक्रम तयार करण्याचा प्रदिर्घ अनुभव असलेल्या शिक्षणक्षेत्रात कार्यरत असलेल्या उच्चशिक्षीत व्यक्तींनी बदलत्या परिस्थितीचा विचार करून शालेय शिक्षणात सकारात्मक व रचनात्मक बदलाचे योगदान देण्यासाठी एका निश्चित क्रांतदर्शीत्वाने घडविला आहे. कार्यरत प्रशिक्षीत शिक्षकांच्या सहभागाने त्यांच्या शाळेत वा त्यांच्या परिसरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्ररित्या राबवायचा आहे.

भाषांतर कौशल्याच्या उपयोजनाने प्रभावीपणे वापर करून स्त्रोत भाषा (इंग्रजी-मराठी) तसेच लक्ष्य भाषा मराठी-इंग्रजी) दोहोंवर उत्तम प्रभुत्त्व मिळविता येते. स्त्रोत व लक्ष्य भाषा दोहोंतील व्याकरण व्यवस्था, शब्दसंग्रह, अचूक शब्द योजना, विविध लेखन व साहित्यप्रकार तसेच विविध शैली यांचा अभ्यास करता येतो. एकूण भाषिक जाण प्रगल्भ व सघन होते. ब्रिटिशांच्या काळात तर्खडकरांच्या भाषांतरपाठमालेद्वारे अनेक पिढयांनी इंग्रजी आत्मसात केले. भाषांतरकौशल्य हे मुलतः बोधनक्षमता विकासक असल्याने बुद्धीच्या व विचारशक्तीच्या जडणाघडणीत कळीची भूमिका बजावू शकते. आजच्या ज्ञानयुगाच्या परिप्रेक्षात भाषांतरकौशल्याचा भाषासंपादन, संवर्धन व साधनेसाठी पद्धतशीर अध्ययनाद्वारे मोठा उपकारक उपयोग करता येणे शक्य आहे. भाषांतरकौशल्यातून भाषेच्या व त्यातूनच विचारशक्तीच्या विकासाच्या व प्रत्यक्ष उपयोजनाच्या मौलिक संधी उपलब्ध होतात. अलिकडच्या अत्याधुनिक चेताशास्त्रीय संशोधनानुसार मेंदू विकसनावर आधारीत ज्ञानरचनावादी शिक्षणप्रणालीत भाषांतरकौशल्याचा व्यासंगी अभ्यासातून प्रज्ञाविकासाच्या अनेक संधी शालेय विद्यार्थ्यांना देऊन त्याच्या विचार व कल्पनाशक्तीला चालना देता येईल. उच्च अभिरूची रूजविता येईल. तसेच त्यांच्या जाणिवांची, संवेदनांची, व नेणीवेची कक्षा विस्तारता येईल. त्याद्वारे त्यांना अधिक प्रगल्भ करून त्यांची समाजाप्रती सामिलकीची व उत्तरदायित्त्वाची जाणिव वृद्धिंगत करता येईल. यासाठी भाषांतराचा शालेय शिक्षणात समावेश व्हायला हवा.

आमच्या संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या या अभ्यासक्रमाचा कालावधी सहा महिने असून यात आपल्याला भाषांतर कौशल्याचे आवश्यक दूरस्थ पद्धतीने प्रशिक्षण दिले जाईल. यात भाषांतराद्वारे स्वाध्यायनपद्धतीने इंग्रजी आत्मसात करण्याविषयी संस्थेने संशोधनाद्वारे विविध पद्धती व संसाधने विकसीत केली आहेत. या कामी आम्हाला आमच्या "इंग्लिशफाऊन्टन" (www.englishfountain.com) या सहयोगी संस्थेचे सहकार्य लाभले आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ इंग्लिशफाऊन्टीन विविध स्तरांवर इंग्रजी भाषा कौशल्य प्रशिक्षणातील अग्रणी संस्था आहे.

## तुम्ही शिक्षकच नव्हेत;
## तुम्ही आहात तर "समाजाला ज्ञानयुगात नेणारे ज्ञानकर्मी ज्ञानव्यावसायिक ज्ञानयोगी!"

गेली अनेक वर्षे आम्ही विविध कंपन्यांना ज्ञानव्यवस्थापनाच्या सेवा देतो. सध्याचे युग ज्ञानयुग आहे. या ज्ञानयुगात तुम्ही केवळ "शिक्षक"च नसून "ज्ञान व्यावसायिक ज्ञानयोगी" आहात अशी आमची धारणा आहे. आमच्या अनेक संशोधनपर शोधनिबंधात आम्ही ही भूमिका सातत्याने ठामपणे मांडली आहे. आम्ही तुमच्याकडे समाजाला "ज्ञानयुगात नेणारे ज्ञानव्यावसायिक ज्ञानकर्मी ज्ञानयोगी शिक्षक" या दृष्टीने पाहातो. देशाचे एक ज्येष्ठ ज्ञानकर्मी महाराष्ट्राचे सपुत्र आणि आमचे एक प्रेरणास्थान डॉ. राघुनाथ माशेलकर आणि विख्यात शास्त्रज्ञ व विचारवंत भारतरत्न डॉ. सीएनआर राव यांसारख्या प्रभुती हाच विचाार मांडतात. शिक्षकाच्या भूमिकेकडे "अभ्यासक्रम शिकवून परीक्षेसाठी तयार करणारा" अशा संकुचित पारंपारिक दृष्टीने न् पाहाता समाजाची ज्ञानाच्या मुशीत, ज्ञानाच्या ऐरणीवर सातत्याने नव्याने सर्जनशिल जडणघडण करणारा ज्ञानयोगी म्हणून पाहायला हवे.

### जगभर ज्ञानासाठी स्पर्धा, भारताला असलेली मोठी संधी आणि शिक्षकांची भूमिका

आता जगभरात वर्चस्वासाठी स्पर्धात्मक संघर्ष होतील तो ज्ञानासाठीच आणि ज्ञानाच्या आधारे. म्हणून तर आता नैसर्गिक साधनसंपदेसाठी नव्हे तर उत्तमोत्तम ज्ञानयोग्यासाठी देशांमध्ये स्पर्धा आहे. व्यवस्थापन गुरू पिटर ड्रकर म्हणतात त्याप्रमाणे "आजवर ज्ञान हाच खरा आर्थीक साधनस्त्रोत होता आणि यापुढेही राहिल." खरेखरीच भारतरत्न डॉ. सीएनआर राव म्हणतात त्याप्रमाणे आजचे ज्ञान ही उद्याची संपत्ती आहे. जगभरातल्या प्रज्ञावंतांना आपल्याकडे आकर्षित करण्याची स्पर्धा सुरू आहे. आपल्या देशाने ऐतिहासिक कारणांमुळे औद्योगिक क्रांती व त्यानंतरच्या विविध क्रांत्या आपण गमाविल्या आहेत. मात्र आता आजच्या ज्ञानयुगात भारताला ज्ञानक्रांतीत बाजी मारण्याची मोठी जागतिक संधी आहे. सळसळत्या तरूणांची संख्या, सकारात्मक जनभौगोलिक परिस्थिती, वेगाने विस्तारणारी अर्थव्यवस्था, देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले इंटरनेटचे जाळे, मोबाईलफोनचा प्रसार अशा अनेक जमेच्या बाबी आपल्या बाजूने आहेत. सकल समाजालाच ज्ञानसमाज म्हणून घडविण्याची आणि जागतिक स्तरावर वेगाने मुसंडी मारण्याची आपल्याला न् भूतो न भविष्यती अशी संधी आहे. अर्थात भारताला ज्ञानयुगात नेण्याची सुरूवात शाळेतून व्हायला हवी. आपण शाळेत अपयशी ठरलो तर कोठेही यशस्वी होता येणार नाही. आपले विद्यार्थी केवळ परीक्षार्थी न् राहाता ज्ञानार्थी होऊन ज्ञानमार्गी ज्ञानकर्मी झाला तरच हे घडणार आहे. आणि म्हणूनच विद्यार्थ्यांना, शाळेला, समाजाला आणि देशाला प्रबुद्ध ज्ञानयुगात नेण्यासाठी शिक्षकांची **"ज्ञानयोगी"** म्हणून कळीची भूमिका आहे.

महत्त्वाचे म्हणजे "ज्ञानयोगा"ची संकल्पना आपल्या देशात अनादी काळापासून आहे. "भारत" या शब्दाचा परम महासंगणकाचे कर्ते एक ज्येष्ठ ज्ञानयोगी डॉ. विजय भटकर यांनी "भारत" या शब्दाचा अत्यंत मर्मग्राही अर्थ विशद केला आहे तो असाः **"भा"** म्हणजे ज्ञान; आणि **"रत"** म्हणजे "च्यात रमलेला". भारत म्हणजे ***"ज्ञानात रत असा तो भारत!"*** आपल्या देशाला ज्ञानयोगाची परंपरा हजारो वर्षांपासून आहेच. या ज्ञानयोग्यांचा दैदिप्यमान वारसा आजच्या शिक्षकांसाठी आहे. म्हणूनच शिक्षकांना केवळ नेहमीचा नित्यनेमाने अभ्यासक्रम शिकविणारा असे न् समजता समाजाल ज्ञानयुगात नेणारा ज्ञानयोगी म्हणून पाहाणे गरजेचे आहे. आता विद्यार्थ्यांन केवळ माहिती देणे खचीतच पुरेसे नाही. माहितीतून सर्जनशिल ज्ञान मिळवून त्या ज्ञानाचे यथाशक्ती नवसर्जनासाठी उपयोजन करण्याची क्षमता विकसीत करण्यावर भर हवा. ज्ञानरचनावादाचे सार हेच आहे. माहितीचा महापूर म्हणजे ज्ञानाचा ओघ असणे नव्हे. ज्ञानकर्मी शाळेपासून मनोवृत्तीसह घडवावा लागतो.

ज्ञानकर्मी ते ज्ञानव्यावसायिक ते ज्ञानयोगी हा प्रवास आहे आणि ज्ञानयोगी शिक्षक होण्यासाठी अर्थातच शिक्षकाला पारंपारिक माहितीज्ञानापलिकडे जाऊन विशेष ज्ञानव्यवस्थापनाची कौशल्ये आत्मसात करावी लागतील जेणे करून शिक्षक केवळ माहितीची खिरापत वाटणारा वगैरे न राहाता समाजाची ज्ञानाच्या अंगाने सर्जनशिल जडणघडण करणारा "समाजाचा ज्ञानव्यवस्थापक" होता येईल. या ज्ञानव्यवस्थापन कौशल्यातील एक महत्त्वाचे कौशल्य अर्थातच "भाषांतर कौशल्य" आहे. तसे भाषांतराचे काम कोणालाही जमण्यासारखे वाटत असले तरिही ते पद्धतशीरपणे एक शास्त्र व कला म्हणून शिकून आत्मसात करायला हवे. भाषांतरकार मुळात इतर भाषांतील ज्ञान स्वभाषेत आणून बहुसंख्यांना उपलब्ध करून देणारा ज्ञानकर्मीच असतो. स्वामी विवेकांनदांनी अद्वैताचे तत्त्वज्ञान जगभर नेले त्यातही त्यांची भाष्यकर्ते भाषांतरकार ही भूमिका होतीच. आजच्या ज्ञानयुगात भाषांतरकौशल्य हे ज्ञानाची विषमता (जी आर्थी विषमतेहून अधिक मारक ठरू शकते) दूर करणारे साधन आहे. शिक्षकांनी पद्धतशीरपणे भाषांतर कौशल्य आत्मसात केले तर ते ज्ञाननिर्मीतीत मोठी व्यापक भूमिका बजावू शकतील. इंटरनेटच्या माध्यमातून सर्वदूर ज्ञान उपलब्ध करून देऊ शकतील. यातून सर्व स्तरावर ज्ञानाचे अभिसण वाढेल. हे एक मोलाचे सर्जनशिल योगदान ठरेल. नवसर्जनाचा मार्ग हा ज्ञानमार्गातून जातो. महाराष्ट्रातील शिक्षक पद्धतशीरपणे या ज्ञानकारक भाषांतर कौशल्याचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची मराठी व इंग्रजी दोनही भाषांची व्यासंगी साधना घडवू शकतील. ज्ञानयुगात भाषाज्ञान मोलाचे आहेच. याद्वारे मायमराठीला ज्ञानभाषा करण्याच्या कामी मोलाचे योगदान देता येईल. कल्पना करा. मोठया संख्येने शिक्षक शेकडो उपयुक्त ग्रंथांचे मराठीत भाषांतर करून मायमराठीतला विविध विषयांतील ज्ञानसाठा वाढवीत आहेत. केवढा मोठा सकारात्मक. सक्षमीकरण घडविणारा ज्ञानक्षितीजे विस्तारणारा उपकारक बदल घडून येईल.

अशा क्रांतदर्शी उपक्रमात सहभागी होण्यासाठी नॉलीजफाऊन्टीनतर्फे आपले स्वागत करीत आहोत.

**प्रशिक्षण पद्धती**

मुळात भाषांतर कौशल्य हे कष्टसाध्य कौशल्य असून त्यात निश्चीत गांभीर्याने सातत्याने, चिकाटीने व्यासंगी वृत्तीने स्वाध्यायन करीत प्रगती करण्याची गरज आहे. कोणताही झटपट मार्ग नाही. प्रशिक्षणार्थी शिक्षकांना स्वाध्यायनासाठी दूरस्थ शिक्षणतज्ज्ञांनी तयार केलेले उत्तम छापिल तसेच डिजीटल अभ्याससाहित्य दिले जाईल. तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमातून सातत्याने मार्गदर्शन दिले जाईल. असे प्रशिक्षीत शिक्षक त्यांच्या शाळेत वा स्वतंत्ररित्या विशेष उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी भाषांची व्यासंगी साधना करण्याची आणि त्याद्वारे या भाषांवर उत्तम प्रभुत्त्व मिळविण्याची संधी देऊ शकतील. आपल्या मुलांना मायमराठीची अधिक व्यासंगी गोडी लावता येईल. सेमी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना विशेष लाभ होईल. त्यांना अभ्यासात त्यांच्या वाढत्या भाषाकौशल्याचा मोठा फायदा होईल. भाषेचा सर्जनशिल अभ्यास होत असल्याने त्यांची विचारशक्ती. स्मरणशक्ती, व्यवधान या बोधात्मक क्षमता तसेच अभिव्यक्ती अधिक विकसीत व प्रगल्भ होतील. वाचनाची आवड निर्माण झाल्याने विद्यार्थी केवळ "परीक्षाथी" न् राहाता "ज्ञानार्थी" हातील आणि आजच्या ज्ञानयुगात अधिक सक्षम व समर्थ "ज्ञानकर्मी" होतील. स्वाध्यायन कौशल्यामुळे ते स्वतंत्ररित्या ज्ञानार्जन करू लागतील. महाजालावरील माहिती व ज्ञान स्त्रोतांचा प्रभावी, सर्जनशील उत्पादक वापर करू शकतील. ज्ञानयुगातील उत्कर्षाच्या विविध संधीसाठी अधिक सक्षमरित्या शालेय जिवनातच सुसज्ज होतील.

शाळा हाच खरा प्रारंभबिंदु आहे आणि शालेय शिक्षकाची भूमिका अत्यंत निर्णायक व कळीची आहे हे आता जगभर मान्य केले जात आहे. त्यामुळे शिक्षकांच्या भूमिकेचा नव्याने पुर्नविचार होत आहे. विद्यार्थी बदलत आहे, सभोवतालचा भवताल बदलत आहे, तंत्रज्ञान बदलत आहे त्यामुळे अर्थात शिक्षकालाही वेगवेगळया भूमिकेत जाऊन विद्यार्थ्यांना येऊ घातलेल्या अर्थव्यवस्थेसाठी सुसज्ज करणे हे आव्हान आहे. करोना विषाणूने केलेल्या उलथापालथीतून हे अत्यंत प्रकर्षाने प्रत्ययाला आले आहे.

**ज्ञानगंगा मराठी**

या भाषांतर कौशल्य आत्मसात केलेल्या शिक्षकांच्या मदतीने शेकडो शैक्षणिक पुस्तकांचे, विविध प्रकारच्या ज्ञानमजकूराचे मराठीत भाषांतर करून एक व्यापक विविध विषयांवरील ज्ञानाची विशाल महापाणपोई महाराष्ट्रातील शाळांना उपलब्ध करून दिली जाईल. मराठीत भाषांतरीत करावीत अशी अनेक पुस्तके आम्ही शोधली आहेत. यातून मायमराठीला ज्ञानभाषा करण्यासाठी मोलाचे योगदान देता येईल. "ज्ञानभाषा मराठीसाठी ज्ञानपाणपोई" हा विशेष उपक्रम आम्ही हाती घेत आहोत. त्यासाठी व्यावसायिक भाषांतरकारांची एक प्रशिक्षीत फळी आम्ही प्रशिक्षीत केली असून त्यात साहित्य तसेच विविध ज्ञानक्षेत्रातील ज्ञानमजकूर मराठीत भाषांतरीत करण्याचा उपक्रम सुरू आहे. आमच्या संस्थेतर्फे व्यावसायिक भाषांतरकौशल्याचे दूरस्थ पद्धतीने प्रशिक्षण देणारा महाराष्ट्रातील एक यशस्वी आणि संपन्न असा अभ्यासक्रम गेल्या दिड दशकाहून अधिक काळापासून दिला जातो. आमच्या विद्यार्थ्यांच्या भाषांतरसेवा नावारूपाला आल्या असून अनेकांची अनुवादीत पुस्तके सुपरिचीत प्रकाशकांकडून प्रसिद्ध झाली आहेत. आम्हास सांगण्यात आनंद आहे की आमचे काही प्रशिक्षीत भाषांतरकार महाराष्ट्र शासनाच्या पॅनलवर निवडले जाऊन कार्यरत आहेत. प्रशिक्षीत शिक्षकांना शालेय विद्यार्थ्यांना ज्ञानसंपन्न करण्यासाठी या उपक्रमात निश्चित सहभाग दिला जाईल. प्रशिक्षणार्थींच्या अनुवादांना महाजालावर तसेच विविध वृत्तपत्रे, नियतकालिके तसेच विशेषांकात प्रसिद्धी दिली जाईल तसेच विविध प्रकाशकांकडे शिफारसही केली जाईल. तुम्हाला मराठीत ज्ञानाची पाणपोई सुरू करायची आहे.

अभ्यासक्रमात केवळ भाषांतराद्वारे इंग्रजी व मराठी भाषाप्रभुत्त्व विकास एवढेच घटक नसून वृत्तपत्रिय लेखन, इत्यादीसह लेखन कौशल्यविकासाचे व दूरस्थ पद्धतीने स्वाध्यायन अध्ययनसाहित्य विकासाविषयीचेही प्रशिक्षण दिले जाईल. शाळेत करावयाच्या वर्षभराच्या अनुवाद उपक्रमांचा संसाधनसंच प्रत्येक प्रशिक्षणार्थीला दिला जाईल. अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर महाजालाच्या माध्यमातून सातत्यपुर्ण संवाद तसेच संसाधनांची देवाणघेवाण सुरू राहिल. याघडीला या उपक्रमासाठी कार्यरत शालेय शिक्षकांनाच प्रवेश दिला जाईल. अध्ययनकाळात आमचे सर्वतोपरी सहाय्य व मार्गदर्शन उपलब्ध असतेच. प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करणाऱ्यांना प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. या एकूण उपक्रमात सहभागी होणासाठी नाममात्र शुल्क आकारले जाईल.

शिक्षकहो, समाजाला ज्ञानयोगी करण्याचे आव्हान हे मुलतः शिक्षकांसमोरील आव्हान आहे. या उपक्रमात सहभागी होऊन स्वतःच्या भूमिकेला नवा आयाम देऊ इच्छिणाऱ्या शिक्षकांचे आम्ही स्वागत करतो. अशा स्वरूपाचा हा देशातील पहिलाच उपक्रम आहे. आम्ही आपले पुन्हा एकदा स्वागत करतो.

शेवटी देशाला ज्ञानार्थी करण्याविषयी तुम्हा शिक्षकांना विचारता येईलः
*आता नाही तर कधी?*
*शाळेत नाही तर कोठे?*
*आणि तुम्ही नाही तर कोणी?*

**व्हॉटसअॅपद्वारे सविस्तर माहितीपत्रक मिळविण्यासाठी ८६००१७८८२५ किंवा ९३२५०३२५४७ या क्रमांकावर आपले नाव नोंदवा. आपले शिक्षण, लेखनविषयक कामगिरी, आवडीचे विषय, आपले काही नाविन्यपुर्ण उपक्रम, आपल्याला काय करावेसे वाटते याविषयी माहिती द्या. शविस्तर माहितीपत्रकासह आमच्या विविध वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या लेखांचा व मुलाखतींचा संग्रहही मिळवा.**

आमच्या संस्थांना खालील संकेतस्थळांवर भेट द्याः
**KnowledgeFountain** www.knowledgefountain.org
वीजकीय टपालः knowledgefountain@gmail.com

**EnglishFountain** www.englishfountain.com

***"दिसामाजी काहितरी वाचीत जावे आणि भाषांतरीत करीत जावे,***
***ज्ञानयोगी होऊन आपले आणि सकळांचे मराठी-इंग्रजी समृद्ध करीत जावे."***